**<u>प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ चा जादासरतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. जे. एन. इंगळे यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

७. प्रतिवादी क्र.०५ यांना माझ्या सासऱ्यांनी करुन दिलेल्या खरेदीपत्रावेळी मी प्रतिवादी क्र.०५ चे अ.पा.क. म्हणूण हजर होते. ते खरेदीपत्र सर्वे नंबर ८८–ड मधील मिळकतीचे होते. ते खरेदीपत्र २००१ मध्ये झाले होते. (आत्ता मला निशाणी ४४ सोबत अनुक्रमांक २ ला दाखल केलेले खरेदीपत्र दाखवण्यात आले.) त्या खरेदीपत्रावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ५९ देण्यात आली.

**<u>प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ चा उलटतपास वादी तर्फे विधीज्ञ श्री. डी. बी. सोळुंके यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

८. माझ्या सासऱ्यांना माझे पती हा एकच मुलगा होता. माझ्या सासऱ्यांना हुसेन हा मुलगा आणि जोहरबी ही मुलगी होती हे मला माहित नाही. माझे लग्न केंव्हा झाले हे मला आठवत नाही. माझ्या सासऱ्यांनी १८ एकर जमीन होती हे मला माहित नाही. जोहरबीचे लग्न माझ्या सासऱ्यांनी करुन दिले आहे हे मला माहित नाही. माझे सासरे वयोवृध्द व आजारी होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सासऱ्यांचा सांभाळ वादीने तिच्या सासरी नेवून केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सासऱ्यांची सेवासुश्रूषा वादीने केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सासऱ्यांची सेवासुश्रूषा वादीने केल्यामूळे सासऱ्यांनी तिला हिब्बानामा द्वारे त्यांची सर्वे नंबर ८३ मधील ८३ आर आणि गट नंबर ८८ मधील १ हेक्टर ३४ आर मिळकत दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, २००० सालातील रमजान ईदला माझ्या सासऱ्यांनी तो हिब्बानामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, २००० सालातील रमजान ईदला सर्वे नंबर ८३ मधील ८३ आर आणि गट नंबर ८८ मधील १ हेक्टर ३४ आर मिळकतीचा ताबा वादीला दिला होता.

९. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सासऱ्यांना फसवूण त्यांच्याकडून खोटे खरेदीपत्र करुन घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, २००० साली हिब्बानामा झालेला असताना सासऱ्यांच्याकडून निशाणी ५९ वरील खोटे खरेदीपत्र करुन घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ५९ वरील खरेदीपत्र कोणताही मोबदला न देता करुन घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नंबर ८८–ड मधील जमीनीचा ताबा वादीकडे आहे. गट नंबर ८३–क मधील २ एकर २ गुंठे जमीन माझ्या सासऱ्यांनी खरेदी घेतली आहे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सासरे बोळेगावमध्ये मयत झाले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मयत झाल्यानंतर सासऱ्यांना आमच्या घरी आणले होते. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे नंबर ८८–ड आणि ८८–क या जमीनी मी खरेदी घेतलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे नंबर ८८–ड आणि ८३–क मधील मिळकती वादीला हिब्बानाम्याने दिले आहे आणि उरलेल्या सर्वे नंबर ८२, ९१ या मिळकती माझ्या पतीला ठेवल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही वादीला तिचे नाव ७/१२ ला नमूद नसलयाचा गैरफायदा घेवून हरकत अडथळा करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,**

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.04.29 17:52:24 +0530

**(श्रीमती ए.एस.गुंजवटे)**

**दिनांकः– २९/०४/२०२६.** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, निलंगा.**

**ठिकाणः– निलंगा.** **जिल्हा लातूर.**